

आज
श्रीदत्त
जयंती
कोटी-कोटी प्रणाम

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




www.surajyadigital.com | सोमवार, दि. २५ डिसेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ७६ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८


# देव तारी, त्याला कोण मारी

# एनसीसी विद्यार्थ्याची हुशारी 'तिचे' दैव ठरले भारी

## कामतीच्या हॉटेलमध्ये 'दयानंद'च्या छात्राने वाचविले महिलेचे प्राण

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**देव तारी त्याला कोण मारी,अशी एक मराठीत म्हण आहे.काळ आणि वेळ जुळून आले की माणसाचा घात होतो,असेही म्हणतात.पण एकेकावेळी दैवही बलवत्तर ठरत असते.तिथे मात्र वेळ आणि काळ यांना हतबल व्हावे लागते.असाच एक मानवतेचा प्रसंग मोहोळ तालुक्यातील कामतीच्या एका हॉटेलमध्ये घडला.सोलापुरातील दयानंद महाविद्यालयाच्या एनसीसीच्या एका विद्यार्थ्याने सीपीआरचा वापर करून बेशुद्ध पडलेल्या महिलेचे प्राण वाचवल्याने त्या छात्राची सर्वत्र प्रशंसा होते आहे**

बेगमपूर - सोलापूर हायवेवर कामती गाव आहे. या हायवेर हॉटेल्स आहेत. एका हॉटेलमध्ये एक महिला चहा पिण्यासाठी आली होती. त्याच दरम्यान बेगमपूरहून सोलापूरला निघालेला संतोष पाटील हा एनसीसीचा विद्यार्थी तिथे चहासाठी थांबला होता. ती महिला अचानक खाली कोसळली. जवळच असलेल्या लोकांनी धाव घेतली.

काहींनी तिचे पाय चोळले तर काहींनी कांद्याचा वास दिला. दरम्यान संतोष यानेही धाव घेतली. त्याने त्या महिलेला हलवून पाहिले. तिचा श्र्वास थांबला होता.त्याने पटकन हाताच्या तळव्यांनी तिच्या छातीवर सीपीआरचा हळुवार भार दिला. काही वेळाने ती शुद्धीवर आली. तिने डोळेही उघडले.

काही वेळ तसेच पडून राहिल्यावर ती महिला खुर्चीवर बसली. तिथे असलेल्या नागरिकांनी त्या महिलेला पाणी व चहा आणून दिला. थोड्या वेळात त्या महिलेचा नातू तिथे आला. त्याने त्या महिलेला हॉस्पीटलमध्ये नेले. संतोष पाटील याने त्वरित सीपीआर दिल्यामुळे त्या महिलेचा जीव वाचला. एखाद्या अडचणीच्या वेळी क्षणात घेतलेला निर्णय एखाद्याचे प्राण वाचवू शकतो, असाच एक प्रकार कामती येथे शुक्रवारी घडला.




### प्रशिक्षण फलदायी...

पाटील हा बीए-२मध्ये शिकत आहे.तो बेगमपूर येथे मामाकडे रहातो.२६ जानेवारीमुळे तो सरावासाठी सोलापूरकडे येत होता.दयानंद महाविद्यालयातील छात्रांना सीपीआरचे प्रशिक्षण दिले आहे.पाटीन याने महिलेचे प्राण वाचवल्याने या प्रशिक्षणाची ही फलश्रुती म्हणावी लागेल.

**-प्राचार्य विजयकुमार उबाळे, दयानंद महाविद्यालय.**

### सीपीआर कसा दिला जातो ?



सीपीआर देण्यासाठी कुठल्याही प्रकारच्या औषधाची किंवा इंजेक्शन गरज भासत नाही. ज्या व्यक्तीचा श्वास गुदमरला आहे किंवा हृदयाची गती मंदावली आहे, ती पूर्ववत होऊपर्यंत छातीवर दाब दिला जातो. यामुळे शरीरातील रक्तप्रवाह सामान्य होण्यास मदत होते. याशिवाय सीपीआरमध्ये रुग्णाला तोंडानेही श्वास दिला जातो. सीपीआर देण्याची एक विशिष्ट पद्धत असते. जिचा वापर करून अनेकांचा जीव वाचवता येऊ शकतो. यामुळे त्या व्यक्ती किंवा रुग्णाच्या फुफ्फुसांपर्यंत ऑक्सिजन पोहचतो. यामुळे शरीरात अगोदरच असलेल्या ऑक्सिजनमिश्रित रक्ताला चालना मिळते.

---

### विठ्ठल मंदिर लेखा परीक्षणावरून पुन्हा गोंधळ

## देवाचे सर्व दागिने-वस्तू सुरक्षित

सुराज्य/पंढरपूर




**प्रशासनाचे स्पष्टीकरण**

श्रीविठ्ठल-रूक्मिणी मंदिर समितीकडे असलेले सर्व प्रकारचे दाग -दागिने पूर्णपणे सुरक्षित आहेत. यामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार झालेला नाही असे स्पष्टीकरण मंदिर व्यवस्थापनाने दिले आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या सन २०२१-२२ च्या लेखा परीक्षण अहवालावरून पुन्हा एकदा गोंधळ उडाल्याचे चित्र आहे. मंदिरातील काही मौल्यवान वस्तूंचा तपशील सापडत नसल्याचा शेरा लेखा परिक्षकांनी दिल्यानंतर आता मंदिर प्रशासनाने याबाबत खुलासा केला आहे.

यापूर्वी मंदिराच्या लेखा परीक्षण अहवालात लाडू प्रसादाबाबत देखील ताशेरे ओढले होते. आता यातच मंदिराचे पुरातन वस्तूबाबत लेखा परीक्षणात उल्लेख करण्यात आला होता. यात नित्योपचार विभागातील १५ ठिकाणच्या विविध चांदीच्या वस्तूंची ताळेबंधाला आणि रजिस्टरला नोंद घेतली नसल्याचे दाखविले होते. यात सभा मंडप समोरील चांदीचा दरवाजा, गरुड खांब, चांदीचा मोठा दरवाजा, देवाच्या शेजघराचा दरवाजा यासह १५ ठिकाणच्या चांदीच्या नोंदी नसल्याचे सांगण्यात आले होते. मात्र हे सर्व दारांवरील चांदी ही १८ व्या शतकात अर्पण केलेली असून याबाबत शासनाने तज्ज्ञांकडून त्याची किंमत ठरवून देण्याची मागणी समितीने केली आहे.

श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूरकडे असलेले सर्व प्रकारचे दाग दागिने पूर्णपणे सुरक्षित आहेत. यामध्ये कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार झालेला नाही वा तशी नोंद लेखा परिक्षण अहवालामध्ये नाही. लेखा परीक्षकाने केलेल्या मार्गदर्शक सूचनांबाबत नियमानुसार कार्यवाही करण्याची मंदिर समितीने दक्षता घेतली आहे.

## ऊस ट्रॉलीस धडकल्याने तरुणाचा मृत्यू

सुराज्य/बार्शी



रस्त्याच्या मध्यभागी उभ्या ऊसाच्या ट्रॉलीस पाठीमागून दुचाकीस्वारीची जोरदार धडक बसून झालेल्या अपघातात एकाचा गंभीर जखमी होऊन उपचारापूर्वीच मृत्यु झाला. एक जण जखमी झाला.

घटना रविवारी (ता. २४) सकाळी सव्वा सहा वाजेच्या सुमारास बार्शी-धाराशिव रस्त्यावर तांदूळवाडी (ता. बार्शी) पासून ७०० मीटर अंतरावर घडली. अमीर मुबारक सय्यद (वय २८ ख्वाजानगर, बार्शी) असे अपघातात मृत्यु झालेल्या तरूणाचे नाव आहे. सोहेल शकील खान (वय २० बार्शी) असे जखमी तरूणाचे नाव आहे. तीन दिवसांपूर्वी याच परिसरात बस व दुचाकीच्या अपघातात तीन तरूणांचा जागीच मृत्यु झाला होता. याबाबत सोहेल शकील खान याने पांगरी पोलीसात फिर्याद दिली आहे. अमीर सय्यद व तो धाराशिव येथील मामाकडे मुक्कामी थांबून सकाळी पाच वाजता दुचाकीवरून (क्रमांक एमएच१३ईजी ७०३३) बार्शीकडे जात होते. तांदूळवाडीपासून ७०० मीटर अंतरावर रस्त्याच्या मध्यभागी ऊसाने भरलेल्या ट्रॅक्टर (क्रमांक एमएच १३एजे ५९६१) च्या ट्रॉलीस पाठीमागून जोरदार धडक बसली. त्यात अमीर गंभीर जखमी झाल्याने पांगरी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता मृत्यु झाल्याचे सांगण्यात आले. ट्रॅक्टर चालकाने ट्रॉलीच्या पाठीमागील बाजूस कोणतेही लाल निशाण, इन्डीकेटर लावले नव्हते. त्यामुळे निष्काळजीपणा केल्यामुळे अपघात होऊन मृत्यु व जखमी करण्यास कारणीभूत झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याबाबत तपास हेड कॉन्स्टेबल शब्बीर शेख करत आहेत.

## सुनील केदार यांची आमदारकी रद्द; जिल्हा बँक घोटाळा प्रकरण भोवले

नागपूर : येथील डीसीसी बँकेच्या घोटाळ्या शिक्षा झालेले काँग्रेसचे आमदार सुनील केदार यांची आमदारकी रद्द करण्यात आली आहे.



नागपूर जिल्हा बँक घोटाळा प्रकरणात झालेल्या कारवाईनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. नागपूर जिल्हा बँक घोटाळा प्रकरणात केदार दोषी आढळले होते. त्यामुळे त्यांना ५ वर्षांची शिक्षा झाली. त्यानंतर आता त्यांचे विधानसभा सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे काँग्रेसला विदर्भात मोठा धक्का बसला आहे.

लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर आणि पक्षाच्या वर्धापनदिनाच्या महारॅलीच्या उंबरठ्यावर केदार यांना शिक्षा झाली. त्यामुळे काँग्रेसला धक्का बसला आहे.

## मराळ वस्तीवर चोरट्यांच्या मारहाणीत तिघेजण जखमी

सुराज्य/टेंभुर्णी

घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून तीघा चोरट्यांनी घरात जाऊन कपाटाचा दरवाजा व ड्रॉवर उचकटून चोरी करण्याचा प्रयत्न केला. परत जाताना तियांना लोखंडी टॉमीने मारहाण करून जखमी केले. नंतर चोरटे दुचाकीवरून टेंभुर्णीच्या दिशेने वेगाने निघून गेले.

अरण येथील पालखी मार्गावरील मराळ वस्तीवर ही घटना मध्यरात्री शुक्रवारी (दि. २२ डिसेंबर) दौडच्या सुमारास घडली. टेंभुर्णी पोलीस ठाण्यात याची नोंद झली आहे. धोंडिराम जोतिराम मराळ (वय-५४, पालखीमार्ग, मराळवस्ती,अरणा) यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, मध्यरात्री एकच्या सुमारास शेतातील लाईट आल्यामुळे मोटार चालू करण्यासाठी गेले असता थोड्या वेळाने घराच्या बाजूकडून ओरडण्याचा आवाज आला. घराकडे धाव घेतली असता घरातील आई लक्ष्मी, पत्नी मंदाकिनी, चुलते पांडुरंग मराळ, पुतण्या रोहीत, चुलती कलावती, चुलतभाऊ उत्तम हे घरासमोर घाबरलेल्या अवस्थेत थांबलेले होते. २५ ते ३० वर्षे वयाचे तीन अनोळखी चोरट्यांनी पांडूरंग मराळ, रोहीत मराळ व उत्तम मराळ यांना मारहाण करुन जखमी केले.

## आग लावल्याची विचारणा; सख्ख्या भावास मारहाण

सुराज्य/माळशिरस

आपल्या शेतात बांधून ठेवलेल्या उसाच्या पाचोळ्यास आग लावल्याच्या संशयावरून विचारणा केली असत्या सख्ख्या भावाला जेवण्याचा डबा, लोखंडी गजाने मारहाण करुन जखमी केले.

ही घटना माळशिरस येथील ५९ फाट्याजवळ गुरुवारी सायंकाळच्या सुमारास घडली. शिवाजी पंढरीनाथ कोळेकर (वय-५०, चौगुलेवस्ती, माळशिरस) असे जखमीचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून माळशिरसच्या पोलिसांनी त्यांचा भाऊ भानुदास पंढरीनाथ कोळेकर, पुतण्या चैतन्य कोळेकर या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.



शिवाजी यांनी आपल्या शेतात जनावरांसाठी उसाच्या पाचोळा बांधून ठेवला होता. त्याला कुणीतरी आग लावली होती. यासंदर्भात संशय आल्याने शिवाजी यांनी त्यांचा भाऊ भानुदास याला विचारणा केली. त्यांना मारहाण करून जखमी केले. अशी नोंद पोलिसात झाली. सहाय्यक फौजदार रणदिव तपास करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



**सांता, आमच्यावरील पालकांच्या अपेक्षांचे ओझे कमी कर!**

# पेव फुटले...

# ऐक्यासाठी घातली साद; कसा मिळणार प्रतिसाद ?



सुराज्य/विशेष प्रतिनिधी

राज्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांसाठी प्रत्येक राजकीय पक्षांकडून रणनीती आखली जात आहे.महायुतीचे सरकार आणि महाविकास आघाडी यांच्यात जागा वाटपांचा फार्म्युलाही ठरत आला आहे.आता केवळ मैदानात उतरण्याची तयारी सुरू आहे. सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यांनी एक पाऊल पुढे टाकले असले तरी राज्यात निर्णायक मते असणाऱ्या वंचित बहुजन आघाडी आणि मनसे यांची भूमिका अजूनही तळ्यात-मळ्यात दिसून येत आहे.या पार्श्वभूमीवर केंद्रीय सामाजिक मंत्री तथा रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी एकत्र येण्यासाठी वंचितचे आंबेडकर यांना पुन्हा साद घातली आहे.त्यामुळे रिपाई ऐक्याच्या चर्चेचे पेव फुटले आहे.आठवलेंना आंबेडकरांचा प्रतिसाद कसा मिळणार हे आता पहावे लागेल.

आठवले यांनी राज्यात नवा 'फॉर्म्युला' तयार करण्याचा प्रयत्न चालवला असल्याचे सांगण्यात येते. आठवले यांनी पुन्हा एकदा वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांना सोबत येण्याचे आवाहन केले आहे. आंबेडकर आपल्यासोबत आल्यास देशाच्या राजकारणात दोघांची एकत्रित ताकद निर्माण होईल, असा विश्वास आठवले यांनी व्यक्त केला आहे.

समता परिषदेनिमित्त आठवले नुकतेच यवतमाळ येथे आले होते. यावेळी त्यांनी आंबेडकर यांनी आपल्यासोबत यावे, या आपल्या आवाहनाचा पुनरुच्चार केला. यापूर्वीही आठवले यांनी असे आवाहन केले आहे. रिपाइं आणि वंचित बहुजन आघाडी या दोन्ही पक्षांची ताकद सत्ताधारी आणि विरोधक या दोघांनाही माहिती असल्याने हे दोन्ही नेते नेहमीच चर्चेत असतात. आठवले हे कायम सत्तेच्या बाजूने उभे असतात. त्याचा लाभही त्यांना वेळोवेळी मिळतो. तर, वंचितचे नेते आंबेडकर हे तळ्यात-मळ्यात, अशा अवस्थेत राहत असल्याची चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर आठवले यांच्या भूमिकेबाबत राजकीय पटलावर विविध चर्चेला पेव फुटले आहे.

### साद आहे, प्रतिसाद नाही...

रिपाईच्या ऐक्यासाठी वा आंबेडकरांना पक्षात येण्याबाबत आठवलेंकडून नेहमीच साद घातली जात आहे.गेल्या सहा महिन्यांमधील बातम्या पाहिल्यानंतर आठवलेंनी सातत्याने आंबेडकरांना एकत्र येण्याचे आवाहन केले आहे.काही महिन्यांपूर्वी देवळाली कॅम्प शहरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त झालेल्या सभेत आठवलेंनी समाजाच्या हितासाठी एकत्र या.माझ्या पक्षाचे अध्यक्षपद स्वीकारा.पक्षाचे नेतृत्व घ्या,अशी साद आंबेडकरांना घातली होती.त्यासाठी दोन पाऊल मागे घेण्याची तयारीही त्यांनी दाखवली होती परंतु त्यावर आंबेडकर काहीच बोलले नाहीत.तेव्हा यवतमाळमधील विधानावर आंबेडकर यांच्याकडून काय प्रतिक्रिया येते,याची कार्यकर्त्यांना उत्सुकता लागून आहे.

आंबेडकर यांनी सोबत यावे, अशी आठवले यांचीच भूमिका आहे की, या भूमिकेमागे भाजपच्या नेत्यांची व्यूहरचना आहे, याबाबत वंचित आणि रिपाइं या दोन्ही गटांत मंथन सुरू झाले आहे. आठवले प्रकाश आंबेडकर यांना सोबत येण्याबाबत वारंवार आवाहन करत असले तरी याबाबत आंबेडकर यांनी अद्याप आपले पत्ते खुले केलेले नाहीत. 'इंडिया' आघाडीचा जागा वाटपाचा 'फॉर्म्युला' ठरल्यानंतर कदाचित याबाबत आंबेडकर आपली भूमिका स्पष्ट करतील, अशी चर्चा आहे.